॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ▪ मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ ▪ वर्ष ७ वे ▪ अंक ७७ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ▪ 9420802145

✻ सुविचार ✻

वागण्यात खोटेपणा नसला की जगण्यात मोठेपणा लवकर मिळवता येतो.

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

## नियती

सत्याच्या तलवारीला
नेहमी असते धार
नियतीच्या खेळाचा
योग्य वेळी प्रहार
तोच ठरवतो जगी
काय पुण्य? काय पाप?
ओंजळीच्या आशा
देतो समुद्राचं माप!

# कुकडी कारखान्यावर जिल्हा बँकेचा ताबा

## जिल्हा बँकेचे ३७० कोटींचे कर्ज थकित प्रकरण । जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात खळबळ

**अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकीत ३७० कोटींच्या कर्जाच्या वसूलीपोटी श्रीगोंदा तालुक्यातील पिंपळगाव पिसा येथील कर्मयोगी कुंडलिकराव रामराव जगताप पाटील कुकडी सहकारी साखर कारखान्यांची चल व अचल मालमत्ता ताब्यात घेण्याची कायदेशीर कारवाई सोमवार (दि. ३१) पासून सुरू केली आहे. सरफेसी कायदा २००२ मधील तरतुदींनुसार जिल्हा बँकेने कारखान्यांचा ताबा घेण्याची आणि मालमत्ता सील करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, ऐन जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जगताप यांच्या कारखान्यावर जिल्हा बँकेने कारवाई उगारल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.



गेल्या दोन वर्षापासून जगताप यांचा कुकडी साखर कारखाना सुरू होवू शकलेला नाही. या कारखान्यांसाठी जगताप यांनी जिल्हा बँकेकडून घेतलेले कर्ज व त्याचे व्याज असे मिळून ३७० कोटींचा बोजा झालेला आहे. या थकीत कर्जाच्या वसूलीपोटी बँकेच्यावतीने जानेवारी २०२६ मध्ये कुकडी कारखान्याला नोटीस बजावण्यात आली होती. तसेच ६० दिवसांची मुदत देवून कर्जासह संबंधीत नोटीसीला उत्तर देण्यासाठी मुदत देण्यात आली होती. मात्र, त्यानंतर सुमारे ७ महिन्यांच्या कालावधीत जगताप अथवा कारखाना यांच्यावतीने थकीत कर्ज भरण्यासाठी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, असे बँकेच्यावतीने सांगण्यात आले.

जिल्हा बँकेच्या कर्जाची थकबाकीची रक्कम ३७० कोटींवर पोहचली असून यामुळे जिल्हा बँकेच्या एनपीएच्या रक्कमेत वाढ झालेली आहे. यामुळे बँकेच्या वतीने ३१ ऑगस्टला कारखान्यावर जप्ती व सुपुर्तनामा (ताबा) घेण्याची कारवाई सुरू करण्यात आली. त्यानंतर सोमवार ३१ ऑगस्ट रोजी कुकडी कारखान्यावर जप्तीची नोटीस डकवण्यात आली असून त्या ठिकाणी बँकेच्या मालकीचे बोर्ड लावण्यात आलेले आहेत. कारवाईसाठी बँकेने सरव्यवस्थापक (कर्ज व देखरेख) एस. आर. पाटील यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

प्राधिकृत अधिकारी पाटील आणि बँकेचे अधिकारी कारखान्याचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांच्याशी चर्चा करून संपूर्ण चल व अचल मालमत्ता ताबा घेतील. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष पंचनामा केला जाणार आहे. ताबा घेण्याच्या वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक (अहिल्यानगर) व श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या मदतीने पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ताबा घेतल्यानंतर संपूर्ण कारखान्याची पाहणी करून मालमत्तेला तातडीने सील ठोकण्यात आले. या संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक राहावी, यासाठी फोटोग्राफी आणि व्हिडिओ शूटिंग करण्यात आले. ताबा पूर्ण झाल्यावर मालमत्तेच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक (सिक्युरिटी गार्ड व गनमेन) तैनात करण्यात आले. बँकेच्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना या कारवाईत जबाबदारीने सहभागी होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बँकेच्या या धडक कारवाईमुळे साखर कारखाना क्षेत्रात आणि स्थानिक राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

## SPOT NEWS

### अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडली

**पारनेर –** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती बिघडली आहे. किडनीच्या तपासणीसाठी त्यांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असल्याची माहिती आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिरी आहे. गेल्या काही दिवसांपासून अण्णा हजारे यांची प्रकृती खालावली होती. त्यांना ताप, अशक्तपणा, खोकला, निर्जलीकरण यासारखी लक्षणे जाणवत होती. प्रकृती खालावल्याने अण्णांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. अण्णा हजारे यांच्यावर त्यांच्या मूळ गावी राळेगणसिद्धी येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु प्रकृती खालावल्याने त्यांना बॉम्बे रुग्णालयात हलविण्यात आले असून, तेथे आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.

### मराठ्यांनो मुंबईकडे निघा, पाहुण्यांकडे जाऊन राहा

**जालना –** मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा फडणवीस सरकारला इशारा दिला. 'उपोषण सोडणार नाही, मुंबईत जाणारच', असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सरकारला सांगितले. मनोज जरांगे पाटील यांचा आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे. आज त्यांनी मराठा बांधवांशी संवाद साधत त्यांना आजपासूनच मुंबईकडे निघा आणि पाहुण्यांकडे जाऊन राहा, असे आवाहन केले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी आपण मुंबईमध्ये जाण्यावर ठाम असल्याचे स्पष्टपणे सांगितले. त्यांनी यावेळी सर्व मराठा बांधवांना मुंबईला जाण्याच्या तयारीला लागा असे आदेश दिले.

# राज्यातील २ कोटी ७ लाख नावे प्रारुप मतदार यादीमधून वगळली!

**मुंबई । वीरभूमी –** राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' अंतर्गत राज्याची नवी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. मात्र, या यादीतून राज्यातील तब्बल २ कोटींपेक्षा जास्त मतदारांची नावे वगळण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

सखोल पुनरीक्षणाची ही प्रक्रिया राबवण्यापूर्वी राज्यात एकूण ९,७८,५४,०४९ नोंदणीकृत मतदार होते. परंतु नव्याने प्रसिद्ध झालेल्या मसुद्यात ७,७१,६५,५६२ (७८.८६ टक्के) मतदारांचाच समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच गणना प्रपत्र न मिळाल्याने, गैरहजर असणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंदणीमुळे तब्बल २,०६,८८,४८७ (२१.१४ टक्के) मतदारांची नावे सध्याच्या यादीत समाविष्ट झालेली नाहीत. या नव्या प्रारुप यादीत पुरुष मतदारांची संख्या ३,९५,८९,९०५ इतकी आहे तर महिला मतदारांची संख्या ३,७५,७२,५७० एवढी नोंदवण्यात आली. याशिवाय ३,०८७ तृतीयपंथी मतदारांचा यादीत समावेश आहे.

मतदारांनी त्यांचे नाव निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात आहे की नाही, हे तपासण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. सीईओ महाराष्ट्र या लिंकवर जाऊन प्रारुप मतदार यादी २०२६ यावर आपले नाव तपासावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वगळण्यात आलेल्या किंवा नवीन नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले. नागरिकांना आपले नाव तपासण्यासाठी आणि दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला. यानंतर सर्व अर्जांची छाननी करून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

# डोक्यात दगड मारुन खून करणाऱ्यास जन्मठेप

## देवठाण येथील घटना । संगमनेरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

**संगमनेर । वीरभूमी –** अकोले तालुक्यातील देवठाण येथे दारू पिऊन घराच्या दारात येत शिवीगाळ करणाऱ्या चुलत भावाच्या डोक्यात व तोंडावर दगडाने वार करून खून झाला होता. याप्रकरणी आरोपी काशिनाथ रामनाथ गिहे यास जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय संगमनेरचे न्यायाधीश व्ही. जी. गव्हाणे यांनी जन्मठेपेची शिक्षा व ५० हजार रुपये दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास आणखी तीन महिन्यांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

याप्रकरणी इंदुबाई बारकू गिहे यांनी अकोले पोलीस ठाण्यात ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी फिर्याद दिली होती. त्यानुसार, ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास चुलत दिर आरोपी काशिनाथ रामनाथ गिहे हा दारू पिऊन त्यांच्या घराच्या दारात आला. त्याने शिवीगाळ करत बारकू यांना जिवंत सोडणार नाही, असे म्हटले. त्यानंतर पती बारकू हे घरी आल्यानंतर आरोपीने त्यांना घराच्या दारातील ओट्याजवळ खाली पाडले. जवळ पडलेला मोठा दगड हातात घेऊन त्यांच्या डोक्यात व तोंडावर ४ ते ५ वेळा जोरदार वार केले. गंभीर मार लागल्याने बारकू जागीच निपचित पडले. आरडाओरड ऐकून ग्रामस्थ जमा झाले. त्यांना रुग्णवाहिकेतून अकोले येथील सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. याप्रकरणी अकोले पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला. सहायक पोलीस निरीक्षक मिथून घुगे यांनी तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

याबाबत संगमनेर जिल्हा न्यायालय क्रमांक ४ येथे झालेल्या सुनावणीत सरकारी पक्षाने ७साक्षीदार तपासले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या साक्षी आणि सरकारी वकिलांचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी काशिनाथ गिहे यास जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारी वकील भानुदास जी. कोल्हे यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी म्हणून महिला पोलीस शीतल तोरकडी व स्वाती नाकईवाडी यांनी सहकार्य केले.

# संभाजी ब्रिगेडकडून MHT-CET मध्ये 'महा-घोटाळ्या'चा आरोप!

**अहिल्यानगर । वीरभूमी –** महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या MHT-CET परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक माहितीच्या कथित डेटा लीकप्रकरणी अहिल्यानगरात खळबळ उडाली आहे. MHT-CET PCM² परीक्षेसाठी अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांची नावे, गाव, मोबाईल क्रमांक, ई-मेल व जात-प्रवर्गासह असलेली माहिती खासगी सल्लागार संस्थांकडे कशी पोहोचली, असा गंभीर सवाल उपस्थित करत संभाजी ब्रिगेडने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

प्रा. नारायण शिनगारे व प्रा. अजित खरसडे यांनी या संदर्भात गंभीर आरोप करत, उएढ परीक्षेतील गुणताक्रमात आर्थिक गैरव्यवहार झाला आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, २०२२ मध्ये पहिल्या १०० क्रमांकांमध्ये १०वी-१२वीत ६०-७० टक्क्यांपेक्षा कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सुमारे २ टक्के होते. २०२४ मध्ये हे प्रमाण ६० टक्क्यांपर्यंत, तर २०२६ मध्ये तब्बल ९० टक्क्यांपर्यंत वाढल्याचा दावा करण्यात आला आहे.

या आकडेवारीच्या आधारे १० वी-१२वीत तुलनेने कमी गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना उएढ मध्ये ९९ व १०० पर्सेंटाइल कसे मिळाले, याची स्वतंत्र व तांत्रिक तपासणी व्हावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. मात्र, या दाव्यांची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक असल्याचेही या प्रकरणाच्या गांभीर्याच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट आहे.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती असलेली एक्सेल फाईल गोकुळ एज्यू, एलिव्हेट, प्रेरणा, विस्तार यांसारख्या खासगी संस्थांकडे कशी पोहोचली, याचा तपास झाला पाहिजे. काही संस्थांकडून विद्यार्थ्यांना COEP, VJTI, PICT यांसारख्या नामांकित महाविद्यालयांमध्ये पैशाच्या मोबदल्यात थेट प्रवेश मिळवून देण्याचे फोन येत असल्याचा आरोपही त्यांनी केला.



विद्यार्थ्यांचा वैयक्तिक डेटा अनधिकृतपणे वापरला गेला असल्यास त्यातून पुढे फसवणूक, बनावट प्रवेशाचे आमिष अथवा सोशल मीडिया माध्यमातून गैरवापर होण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी त्यांनी केली.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत यांनी या कथित गैरप्रकारामागे मोठी साखळी असण्याचा संशय व्यक्त केला. यामध्ये- CET सेलमधील डेटा हाताळणारे अधिकारी, परीक्षा घेणारी तांत्रिक कंपनी, डेटा मिळविणाऱ्या अथवा खरेदी करणाऱ्या सल्लागार संस्था, संशयित परीक्षा केंद्रांचे मालक यांची भूमिका तपासली जावी, अशी मागणी त्यांनी केली.

दोन वर्षे अथक अभ्यास करून परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हक्कांवर अन्याय होऊ नये. कथित गैरप्रकारामुळे गुणवंत व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्यास शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, असे प्रा. अजित खरसडे व प्रा. विवेक डोके यांनी सांगितले.

या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडच्या नेतृत्वाखाली शेकडो विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी घोषणा देत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिल्हा संपर्कप्रमुख शाम जरे, प्रा. नारायण शिनगारे, प्रा. अजित खरसडे, प्रा. विवेक डोके, प्रा. सच्चिदानंद घोणसे, प्रा. सुषमा पोळ, प्रा. सुप्रिया गांधी, प्रा. बाळासाहेब कीर्तने, सुदाम कोरडे, सचिन काकडे, महेश दानवे, प्रशांत कांबळे, दादा ठोंबरे, भीमजी कोकाटे, राजेंद्र राऊत, सद्दाम सय्यद, बापू जगताप, दिलीप लबडे, दिलीप वाळुंज आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये गायत्री शिरसाठ, श्रेयसी कदम, शर्वरी राऊत, प्रणव सावंत, जान्हवी भागवत, प्रियांका वरडुले, प्रणव कोटलवाड, सार्थक शिनगारे, उत्कर्ष पोटे, सार्थक अंदुरे, ओम पाटील, राज कदम आदींसह शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

### 'सायबर सेलमार्फत चौकशी करू'

▪ जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी आंदोलकांची भूमिका समजून घेतली. या तक्रारींची सायबर सेलमार्फत चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, तपासात काही गैरबाब आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी आंदोलकांना सांगितले.

## SPOT NEWS

### १२ सप्टेंबरला हरेगाव येथे मतमाऊली यात्रा

● **श्रीरामपूर । वीरभूमी –**

श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील संत तेरेजा चर्चच्या मतमाऊली भक्तिस्थानात सालाबादप्रमाणे यंदाचा ७८ वा मतमाऊली यात्रा महोत्सव १२ व १३ सप्टेंबर रोजी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. यात्रेनिमित्त ४ जुलैपासून सलग नऊ शनिवार हरेगाव येथे नोव्हेना भक्ती संपन्न झाली. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजीनगर धर्मप्रांताचे महागुरुस्वामी रा. रे. डॉ. लॅन्सी बर्नाड पिंटो यांच्या हस्ते ध्वजारोहण करून यात्रेचा औपचारिक शुभारंभ करण्यात येणार आहे. यात्रेपूर्वी ३ ते ११ सप्टेंबरदरम्यान विविध विषयांवर धर्मगुरूंची प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये पवित्र मरिया यांचे श्रद्धा, प्रार्थना, विश्वास, नम्रता, सेवाभाव, आज्ञाधारक जीवन तसेच तरुणांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून असलेले महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. १२ सप्टेंबर रोजी यात्रेचा मुख्य दिवस असून सकाळी ८ वाजता पवित्र जपमाळ व नोव्हेना भक्ती होईल. त्यानंतर स्थानिक धर्मगुरूंच्या हस्ते पवित्र मारियाच्या शिरावर चांदीचा मुकुट चढविण्याचा धार्मिक विधी पार पडणार आहे. त्यानंतर डोंगरासमोर दर्शन रांगेने भाविकांसाठी दर्शनास प्रारंभहोईल. दिवसभर प्रत्येक तासाला विविध धर्मगुरूंच्या उपस्थितीत पवित्र मिस्सा बलिदान होणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता नाशिक धर्मप्रांताचे महागुरुस्वामी रा. रे. डॉ. बार्थोल बरेटो हे प्रमुख याजक म्हणून उपस्थित राहून पवित्र मिस्सा बलिदान प्रसंगी भाविकांना प्रवचनातून मार्गदर्शन करणार आहेत.

# लेखी आश्वासनानंतर राजेंद्र म्हस्केंचे आमरण उपोषण मागे

**१५ दिवसांचा अल्टिमेटम । आश्वासनांची पूर्तता न झाल्यास महावितरण कार्यालयावर ठेंभा मोर्चा**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

महावितरणच्या ढिसाळ कारभाराविरोधात शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांनी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण अखेर महावितरण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. मात्र, आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, या कालावधीत ठोस सुधारणा न झाल्यास महावितरण कार्यालयावर ठेंभा मोर्चा काढून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा म्हस्के यांनी दिला आहे.




उपोषणस्थळी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता इंदूरकर तसेच सर्व संबंधित शाखा अभियंता उपस्थित राहिले. त्यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने व सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, वारंवार वीजपुरवठा खंडित होऊ दिला जाणार नाही, तसेच लाईनवर वारंवार परमिट घेण्याचे प्रकार टाळून आवश्यक देखभाल-दुरुस्तीचे काम करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

यावेळी दररोज होणारे सायंकाळी ६ ते ९ या वेळेतील लोडशेडिंग बंद करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल, नवीन कृषीपंप वीजजोडण्यांसाठी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला जाईल, तसेच जुन्या वीजजोडण्यांवर नवीन रोहित्र मंजुरीचा प्रस्ताव प्राप्त होताच तो तातडीने वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात येईल, असेही लेखी आश्वासन देण्यात आले.

रस्त्यालगत सोलर कंपनीने उभारलेले वीजेचे पोल शेतकरी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रस्त्यापासून १५ फूट अंतरावर हलविण्यात येतील, असेही महावितरण प्रशासनाने लेखी स्वरूपात मान्य केले.

महावितरण प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर नायब तहसीलदार जाधव यांच्या हस्ते राजेंद्र म्हस्के यांनी आमरण उपोषण मागे घेतले. मात्र, लेखी आश्वासन देऊन विषय संपणार नाही; १५ दिवसांत प्रत्यक्ष काम दिसले पाहिजे, असा स्पष्ट इशारा म्हस्के यांनी दिला. तसेच प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची मुदतीत पूर्तता न झाल्यास शेतकऱ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरवत महावितरण कार्यालयावर ठेंभा मोर्चा काढण्यात येईल आणि आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनाला हरिदास शिर्के, रघुनाथ सूर्यवंशी, शहाजी कोरडकर, अशोक नवले, शशिकांत पवार, महादेव म्हस्के, अरुण जगताप, राजेंद्र विधाटे, गंगाराम दरेकर, हरिभाऊ खामकर, विलास म्हस्के, अनिल ठवाळ यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## धनधान्यांनी केला सोमेश्वराचा मनोहारी शृंगार

**तिसऱ्या श्रावणी सोमवारी पावसासाठी भाविकांचे आर्त साकडे**

● **पाथर्डी । वीरभूमी–**

श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारी पाथर्डी शहरातील श्री सोमेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले. विविध प्रकारच्या धान्यांनी केलेला शिवपिंडीचा मनोहारी शृंगार भाविकांचे विशेष आकर्षण ठरला.



सकाळपासूनच श्री सोमेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. महिला भाविकांमध्ये शिवामूठ अर्पण करण्यासाठी मोठी झुंबड उडाली. बेलपत्र, फुले व शिवामूठ अर्पण करून भाविकांनी महादेवाचे दर्शन घेतले. अनेक भाविकांनी विधिवत महाभिषेक करून भगवान सोमेश्वराची आराधना केली.

यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने पाथर्डी तालुक्यासह परिसरातील शेतकरी चिंतेत आहे. त्यामुळे तिसऱ्या श्रावणी सोमवारी श्री सोमेश्वराच्या चरणी पावसासाठी आर्त साकडे घालण्यात आले. पाथर्डी तालुक्यासह पावसाची प्रतीक्षा असलेल्या सर्व भागांत समाधानकारक पाऊस पडावा, शेतशिवार हिरवेगार व्हावे आणि बळीराजाचे घर धनधान्याने समृद्ध व्हावे, अशी भावपूर्ण प्रार्थना भाविकांनी केली.

सायंकाळी महाआरतीच्या वेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'हर हर महादेव'च्या जयघोषात आरती केली. घंटानाद व जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. दिवसभर दर्शनासाठी झालेल्या गर्दीमुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

विविध धान्यांनी केलेला शिवपिंडीचा शृंगार हा केवळ धार्मिक विधी न ठरता अन्नदाता बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठीची भावनिक प्रार्थना ठरली. प्रत्येक कुटुंबाची चूल पेटविणाऱ्या धान्याचे महादेवाच्या चरणी अर्पण करून भाविकांनी निसर्गदेवतेकडे कृपावृष्टीची विनवणी केली.

कार्यक्रमाच्या सांगतेनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मोठ्या संख्येने भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

'महादेवाच्या कृपाछायेत पावसाच्या रूपाने आभाळ भरून यावे आणि बळीराजाच्या शिवारात पुन्हा हिरवाई नांदावी,' अशीच भावना तिसऱ्या श्रावणी सोमवारी श्री सोमेश्वराच्या चरणी नतमस्तक झालेल्या भाविकांच्या मनात होती.

## श्रीरामपूर मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

● **श्रीरामपूर । वीरभूमी –**

२२० श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघातील विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात एस.आय. आर अंतर्गत पहिल्या टप्प्यातील मतदार पडताळणीचे काम पूर्ण झाले असून, काल (दि. ३१) प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारसंघात एस.आय. आर. पूर्वी एकूण ३,०५,४९७ मतदार होते. प्रारूप यादीत २,७४, ७२३ मतदार समाविष्ट असून ३०,७७४ मतदार वगळण्यात आले आहेत. यामध्ये मयत १०,२०८, अनुपस्थित ४,३८३, कायमस्वरूपी स्थलांतरित ११,९४७, दुबार ४,१७२ व इतर ६४ मतदारांचा समावेश आहे. सदर प्रारूप मतदार यादी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपरिषद श्रीरामपूर व देवळाली प्रवरा, सर्व तलाठी कार्यालये व सर्व मतदान केंद्रांवर बी.एल.ओ. यांच्याकडे निरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदणीसाठी नमुना ६ भरावा.

## रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये 'वृक्षाबंधन' उत्साहात

**झाडांना राख्या बांधून विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश**

● **शेवगाव । वीरभूमी–**

रक्षाबंधनाचे औचित्य साधून येथील रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा अनोखा 'वृक्षाबंधन' उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्या शाळेच्या परिसरातील झाडांना बांधून वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा संकल्प केला. रक्षाबंधनाच्या पारंपरिक सणाला पर्यावरण संवर्धनाची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे पालक व परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड होते. यावेळी विद्यार्थ्यांनी परस्परांना राख्या बांधून भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा व परस्पर संरक्षणाची भावना व्यक्त केली. रक्षाबंधनाच्या पौराणिक संदर्भावर मार्गदर्शन करताना प्राचार्य गायकवाड म्हणाले की, भगवान श्रीकृष्णाने द्रौपदीचे रक्षण केले. त्याच भावनेतून विद्यालयातील सर्व मुली आपल्या भगिनी असून, त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.

यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारातील विविध झाडांना राख्या बांधल्या. 'झाडे ही आपली भावंडेच आहेत; त्यांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे,' असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. वृक्षतोड रोखणे, झाडांचे संगोपन करणे, अधिकाधिक वृक्षलागवड करणे आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

विद्यालयाचे हरित सेना प्रमुख सचिन दहिफळे यांनी वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व व पर्यावरण संतुलनातील त्यांची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वृक्षांपासून प्राणवायू, सावली, फळे व विविध उपयुक्त घटक मिळतात. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यावश्यक असून, वृक्षांकडे केवळ संसाधन म्हणून न पाहता कुटुंबातील सदस्याप्रमाणे त्यांची काळजी घेतली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

झाडांना राख्या बांधताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्यांमुळे शाळेच्या परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम विशेष ठरला.


हा उपक्रम प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे व पर्यवेक्षक महेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला.

## 'माझा गड, माझी जबाबदारी'तून
# शिवपट्टण किल्ल्यावर स्वच्छता

**संत वामनभाऊ तरुण मंडळाचा पुढाकार; भगवा ध्वज फडकवत मावळ्यांनी जागविला इतिहासाचा अभिमान**

● **पाथर्डी । वीरभूमी –**

'माझा गड, माझी जबाबदारी' या संकल्पनेतून संत वामनभाऊ तरुण मंडळाच्या वतीने जामखेड तालुक्यातील खर्डा येथील ऐतिहासिक शिवपट्टण अर्थात खर्डा किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मंडळाच्या सदस्यांनी किल्ल्यावरील प्लास्टिक, गवत व इतर कचरा हटवून परिसर स्वच्छ केला. त्यानंतर किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर भगवा ध्वज फडकावत ऐतिहासिक वारशाविषयीचा अभिमान व्यक्त केला.



संत वामनभाऊ तरुण मंडळाची स्थापना १९९० मध्ये झाली असून, मंडळाचे हे ३७ वे वर्ष आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रम राबविले जात आहेत. रक्तदान व आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम, अन्नदान, श्रमदान, मतदार नोंदणी, तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक व बालकांसाठी विविध उपक्रम आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष तथा शिवव्याख्याते सचिन नागापुरे यांनी शिवपट्टण किल्ल्याचा इतिहास सांगितला. खर्डा येथील हा किल्ला बालाघाटच्या डोंगररांगांमध्ये वसलेला असून, सरदार आप्पासाहेब निंबाळकर यांनी १७४३ ते १७४५ च्या सुमारास तो बांधला. याच ऐतिहासिक भूमीवर ११ मार्च १७९५ रोजी मराठे आणि निजाम यांच्यात प्रसिद्ध खर्ड्याची लढाई झाली. निजामाचा पराभव करून मराठा सरदारांनी येथे भगवा फडकाविला होता. त्यामुळे या किल्ल्याची माती प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची असल्याचे नागापुरे यांनी सांगितले.

स्वच्छता मोहिमेदरम्यान सदस्यांनी किल्ल्यावरील प्लास्टिक व गवत गोळा करून परिसर स्वच्छ केला. प्रवेशद्वारावर भगवा ध्वज फडकावल्यानंतर सर्व सदस्यांनी किल्ल्याची माती कपाळी लावून ऐतिहासिक भूमीला नतमस्तक होत अभिवादन केले. त्यानंतर सरदार आप्पासाहेब निंबाळकर यांच्या समाधीचीही स्वच्छता करण्यात आली.

यावेळी खर्डा गावचे माजी सरपंच वैजनाथ पाटील, महालिंग कोरे पाटील तसेच पत्रकार संतोष थोरात यांनी शिवपट्टण किल्ला व परिसरातील बारा ज्योतिर्लिंगांची माहिती उपस्थितांना दिली.

स्वच्छता मोहिमेत शिवव्याख्याते सचिन नागापुरे, अशोक जेधे सर, प्रवीण आव्हाड, भूषण नागापुरे, कृष्णा जेधे, सुजल गाडे, छोट्या गव्हाणे, मंगेश कोकीळ, पियुष गायकवाड, लक्ष बाफना आदी मंडळाचे सदस्य सहभागी झाले.

## अकोल्यात शुक्रवारी श्रीकृष्ण जन्मोत्सव

**श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचा ३० वा वर्धापन दिन; विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**



● **अकोले । वीरभूमी–**

प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, पाटील गल्ली, अकोले या केंद्राची गोकुळाष्टमीच्या दिवशी स्थापना झाली. यंदा केंद्राला ३० वर्षे पूर्ण होत असून, येत्या शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी ३० वा वर्धापन दिन व श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती केंद्राचे सेवेकरी श्री. संजय हुजबंद यांनी दिली.

वर्धापन दिन व श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त केंद्रामध्ये सकाळी १०.३० वाजता नैवेद्य आरतीनंतर मार्गदर्शनपर हितगूज व सामुदायिक ७०० श्लोकी भागवत पारायण होणार आहे.

तसेच रात्री ९ ते १ वाजेपर्यंत संगमनेर येथील सेवेकऱ्यांचे 'स्वामी स्वरांजली' गीत गायन व सेवेकऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. रात्री १२.३९ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना नागरिक, श्री स्वामी समर्थ सेवेकरी तसेच भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## नगर शहरातील परदेशी खून प्रकरणाचा तपास ‘एसआयटी’कडे देण्याची मागणी


**अहिल्यानगर । वीरभूमी–**

मनपाचे कर्मचारी धीरज परदेशी यांच्या खून प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सकल हिंदू समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने स्वतंत्र विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करून तपास त्यांच्याकडे वर्ग करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना देण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप उपस्थित होते. या निवेदनात खून प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांकडून न्यायालयात सादर करण्यात आलेल्या रिमांड रिपोर्टमध्ये गंभीर शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या रिपोर्टमध्ये परदेशी यांचा खून जुन्या वादातून झाल्याचा दावा करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, संबंधित जुन्या वादाच्या फिर्यादीत परदेशी यांचे नाव नसल्याचा दावा सकल हिंदू समाजाने केला आहे. तसेच घटनास्थळावरील सीसीटीव्हीची पडताळणी केली असता त्यातही परदेशी दिसत नसल्याचे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलिसांच्या तपासातील निष्कर्ष आणि उपलब्ध पुरावे यांच्यात विसंगती आहे का, याची स्वतंत्रपणे तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. घटनेच्या दिवशी परदेशी हे सावेडी परिसरातील कामाच्या ठिकाणी उपस्थित होते, असा दावा सकल हिंदू समाजाने केला आहे. त्यांनी आपल्या वरिष्ठांना जीपीएस स्थानाचे फोटो पाठविल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# श्रीगोंदातील लेंडी नाला पुलाचे काम रखडले

**सहा-सात महिन्यांपासून रस्त्याचे काम कासवगतीने । कामात सुधारणा न झाल्यास संभाजी ब्रिगेडकडून ‘वर्षश्राद्ध’ आंदोलनाचा इशारा**






### ‘वर्षश्राद्ध’ आंदोलनाचा इशारा!

■ लेंडी नाला पूल, भराव आणि शहरातील मुख्य रस्त्याच्या कामाला तातडीने गती देऊन दर्जेदार काम पूर्ण करावे, अन्यथा संभाजी ब्रिगेडकडून या रखडलेल्या कामाचे ‘वर्षश्राद्ध’ घालून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**श्रीगोंदा । वीरभूमी –**

शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वरील श्रीगोंदा बाजारतळाजवळील लेंडी नाला पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले असले, तरी पुलालगतच्या भरावाचे काम अनेक दिवसांपासून रखडल्याने नागरिक आणि वाहतूकदारांची मोठी गैरसोय होत आहे. त्यातच महाराष्ट्र स्टेट इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या रस्त्याचे कामही अत्यंत संथगतीने सुरू असल्याने श्रीगोंदा शहरातील नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत.

जानेवारी–फेब्रुवारीमध्ये सुरू झालेली ही कामे अद्याप पूर्णत्वास गेलेली नाहीत. गेल्या सहा–सात महिन्यांपासून महामार्गाचे काम कासवगतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. विशेषतः सोमवारी बाजाराच्या दिवशी बाजारतळ परिसरात धुळीचे साम्राज्य, वाहतुकीचे अडथळे आणि गाळाधारकांची होणारी गैरसोय यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे.

लेंडी नाला पुलालगत करण्यात येणाऱ्या भरावाच्या कामात चांगल्या दर्जाचा मुरूम वापरण्याऐवजी मातीमिश्रित मुरूम आणि मोठमोठे दगड वापरले जात असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित यंत्रणेने कामाच्या दर्जाची तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या रखडलेल्या कामांविरोधात संभाजी ब्रिगेडने वेळोवेळी निवेदने देऊन तसेच विविध प्रकारची आंदोलने करून प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. मात्र, त्यानंतरही कामाच्या गतीमध्ये अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

शिरूरला जोडणारा श्रीगोंदा शहरातील महत्त्वाचा मुख्य रस्ताही दीर्घकाळापासून रखडलेला आहे. या कामाच्या संथगतीविरोधात संभाजी ब्रिगेडने फेब्रुवारी महिन्यात दशक्रिया विधी आंदोलन केले होते. मात्र, परिस्थितीत फारसा बदल झालेला नसल्याने आता संघटनेने प्रशासनाला पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

याबाबत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे व नाना शिंदे यांनी तहसीलदार सचिन डोंगरे यांना निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. आता प्रशासन या इशाऱ्यानंतर तरी जागे होणार का आणि रखडलेल्या कामांना गती मिळणार का, याकडे श्रीगोंदावासीयांचे लक्ष लागले आहे.

## घनकचरा विभागातील मनुष्यबळाचे नियोजन संशयाच्या भोवऱ्यात!

**कर्मचारी व वेतनखर्च वाढल्यानंतरही कचरा संकलनाचा कोट्यवधींचा ठेका कशासाठी? : उडानशिवे**

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित मनुष्यबळात वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्यांमुळे वाढ होत असताना, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर महानगरपालिकेच्या तिजोरीतून मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. मात्र, दुसरीकडे शहरातील कचरा संकलनाचे काम खासगी ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च सुरूच आहे. त्यामुळे महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध असताना कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराची आवश्यकता नेमकी का आहे, असा गंभीर प्रश्न कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरचे जिल्हा समन्वयक विकास भाऊसाहेब उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नियुक्त अथवा उपलब्ध झालेल्या वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावरील काही कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात बांधकाम विभाग तसेच पाणीपुरवठा विभागात कामासाठी पाठविले जात असल्याची माहिती समोर येत असल्याचा दावा उडानशिवे यांनी केला आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा नेमका वापर कुठे आणि कशासाठी केला जात आहे, याबाबत महानगरपालिकेने पारदर्शकपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महानगरपालिकेच्या सेवेत कर्मचारी संख्या वाढत असताना त्यांच्या वेतनासाठी सार्वजनिक निधीतून खर्च होत आहे. मात्र, त्याचवेळी शहरातील कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदाराला स्वतंत्रपणे कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असल्यास ही दुहेरी आर्थिक व्यवस्था का निर्माण झाली आहे, याचा खुलासा प्रशासनाने करणे गरजेचे आहे. जर घनकचरा व्यवस्थापन विभागाशी संबंधित कर्मचारी इतर विभागांमध्ये कार्यरत केले जात असतील, तर त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन विभागात मनुष्यबळाची कमतरता निर्माण होत असल्याचे कारण पुढे करून खासगी ठेकेदारामार्फत कचरा संकलन सुरू ठेवले जात आहे का, असा प्रश्नही उडानशिवे यांनी उपस्थित केला आहे.

महानगरपालिकेने उपलब्ध मनुष्यबळाचे योग्य नियोजन करून त्यांचा त्यांच्या मूळ कामासाठी वापर करणे आवश्यक आहे. कर्मचारी उपलब्ध असताना त्यांना इतर विभागांत पाठवून त्याच कामासाठी बाह्य यंत्रणेला कोट्यवधी रुपयांचा ठेका देणे योग्य आहे का, याचा आर्थिक तसेच प्रशासकीय पातळीवर पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. विकास उडानशिवे यांनी महानगरपालिका प्रशासनासमोर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावर आतापर्यंत एकूण किती कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यापैकी किती कर्मचारी घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित आहेत, तसेच त्यापैकी किती कर्मचाऱ्यांना बांधकाम विभाग आणि किती कर्मचाऱ्यांना पाणीपुरवठा विभागात पाठविण्यात आले आहे, याची माहिती जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागात सध्या प्रत्यक्ष कचरा संकलनाच्या कामासाठी किती महानगरपालिका कर्मचारी उपलब्ध आहेत, या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर दरवर्षी किती खर्च होतो आणि खासगी कचरा संकलन ठेकेदारावर दरवर्षी किती रक्कम खर्च केली जाते, याचा संपूर्ण तपशील नागरिकांसमोर ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. एकीकडे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर सार्वजनिक निधी खर्च होत असताना, दुसरीकडे त्याच स्वरूपाच्या कामासाठी खासगी ठेकेदारावर मोठ्या प्रमाणात खर्च होत असेल, तर या आर्थिक नियोजनाचा फेरआढावा घेणे आवश्यक असल्याचे उडानशिवे यांनी म्हटले आहे.

महानगरपालिकेने वारसाहक्क व अनुकंपा तत्त्वावर कर्मचारी नियुक्त केले आहेत. त्यांच्या वेतनावर जनतेचा पैसा खर्च होत आहे. मात्र, हे कर्मचारी घनकचरा व्यवस्थापनाचे काम न करता बांधकाम किंवा पाणीपुरवठा विभागात पाठविले जात असतील आणि त्याचवेळी कचरा संकलनासाठी खासगी ठेकेदारावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात असतील, तर या संपूर्ण व्यवस्थेचा आर्थिक व प्रशासकीय खुलासा जनतेसमोर झाला पाहिजे, अशी भूमिका विकास उडानशिवे यांनी मांडली.

## राजेंद्र फंड यांची शेतकरी साहित्य संमेलनाच्या समारोपीय अध्यक्षपदी निवड

**३ ते ९ सप्टेंबरदरम्यान १५ वे अ. भा. मराठी शेतकरी ऑनलाइन साहित्य संमेलन**

**राहाता । वीरभूमी–**



शेतीसाहित्याशी निगडित बहुचर्चित असलेल्या अखिल भारतीय मराठी शेतकरी ऑनलाइन साहित्य संमेलनाच्या समारोपीय सत्राच्या अध्यक्षपदी साहित्यिक राजेंद्र फंड यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे आयोजक तथा शेतकरी संघटनेचे नेते साहित्यिक गंगाधर मुटे यांनी ही घोषणा केली.

यंदाचे १५ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी ऑनलाइन साहित्य संमेलन दि. ३ ते ९ सप्टेंबरदरम्यान होणार आहे. या कालावधीत दररोज रात्री ९ वाजता कवी संमेलन, गझल मुशायरा यांसह शेतीसाहित्याशी निगडित विविध साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा व्हावी, शेती क्षेत्रातील नवनवीन संशोधनाचे फायदे–तोटे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावेत, साहित्यिकांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण व्हावी आणि तळागाळातील साहित्यिकांकडून अधिकाधिक वास्तववादी शेतीसाहित्य निर्माण व्हावे, हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी करणारे युगात्मा शरद जोशी यांचे साहित्य साहित्यिक, साहित्यरसिक व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम या संमेलनाच्या माध्यमातून केले जात आहे.

विदर्भातील आर्वी येथील शेतकरी संघटनेचे नेते साही. गंगाधर मुटे यांनी मान. शरद जोशी यांच्या हस्ते पहिले अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित केले होते. त्यानंतर कवी विठ्ठल वाघ, रावसाहेब बोराडे, मकरंद अनासपुरे, नाना पाटेकर, सरोजताई काशीकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत आयोजित संमेलनांना उपस्थिती लावली आहे.

कोरोना काळातही ऑनलाइन साहित्य संमेलनाची परंपरा कायम ठेवण्यात आली. आजच्या १५ व्या संमेलनापर्यंत हे महाराष्ट्रातील शेतीप्रबोधन करणारे महत्त्वाचे साहित्य संमेलन म्हणून ओळखले जात आहे. शेतकरी गझल मुशायरा आणि विश्वस्तरीय लेखनस्पर्धा हे या संमेलनाचे विशेष साहित्यिक उपक्रम आहेत.

या ऑनलाइन साहित्य संमेलनात सहभागी होण्यासाठी YouTube वरील "Chawdi' चॅनेलवर Live प्रक्षेपण पाहावे, असे आवाहन आयोजक साहित्यिक गंगाधर मुटे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार पतसंस्थेच्या चेअरमनपदी राजेंद्र दगडखैर

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्या., शेवगावच्या चेअरमनपदी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर (शेवगाव), व्हाईस चेअरमनपदी सय्यद अफसरपाशा (पुणे) आणि मानद सचिवपदी बापूसाहेब जगदाळे (श्रीरामपूर) यांची बिनविरोध निवड झाली. सर्व संचालकांच्या एकमताने झालेल्या या निवडीमुळे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

नवीन चेअरमन, व्हाईस चेअरमन व मानद सचिवांच्या निवडीसाठी नुकतीच तांत्रिक भवन, अहिल्यानगर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संबंधित पदांसाठी उमेदवारी अर्ज मागविण्यात आले. चेअरमनपदासाठी अजिनाथ उर्फ राजेंद्र दगडखैर, व्हाईस चेअरमनपदासाठी सय्यद अफसरपाशा तसेच मानद सचिवपदासाठी बापूसाहेब जगदाळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज प्राप्त झाले. प्रत्येक पदासाठी एकच अर्ज प्राप्त झाल्याने आणि सर्व संचालकांनी एकमत दर्शविल्याने तिन्ही पदांवरील निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले. संस्थेच्या कारभाराची जबाबदारी आता नूतन पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पुढे जाणार आहे.

ही निवड प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयाचे सहाय्यक निबंधक बाळकृष्ण शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रक्रिया पूर्ण केली. संस्थेचे कार्यकारी संचालक अरुण इंगळे यांनी त्यांना सहकार्य केले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, सेवकवृंद तसेच सदिच्छा मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ संचालक भाऊसाहेब भाकरे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेने संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या कार्यातून आदर्श निर्माण केला असून, संस्थेने लौकिक मिळविला आहे. सभासदांच्या हितासाठी विविध योजना राबविण्याबरोबरच ठेवीदारांसाठीही आकर्षक ठेव योजना राबविण्यात आल्या आहेत. संस्थेचा कारभार उत्तम पद्धतीने सुरू असताना नूतन पदाधिकारीदेखील याच वाटेवरून पुढे जात संस्थेच्या प्रगतीला अधिक गती देतील, असा विश्वास भाकरे यांनी व्यक्त केला. सभासदांचे हित, संस्थेची आर्थिक भक्कमपणा आणि भविष्यातील विकासाच्या दृष्टीने नूतन पदाधिकारी प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

बिनविरोध निवड जाहीर होताच उपस्थित संचालक, पदाधिकारी व सेवकवृंदांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली तसेच नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# श्रावणी तिसऱ्या सोमवारनिमित्त माळेगावच्या महादेव मंदिरात भाविकांची मांदियाळी

**२२ भाविकांचे रक्तदान । हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता**

**शेवगाव । वीरभूमी–**



श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारनिमित्त माळेगाव येथील जागृत महादेव मंदिरात भाविकांची मोठी मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. यानिमित्त मंदिर परिसरात छोटी यात्राही भरली होती.

श्रावण सोमवारच्या पवित्र पर्वाला धार्मिकतेसोबत सामाजिक बांधिलकीची जोड देत महादेव देवस्थान, शेवगाव यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत २२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ‘रक्तदान हेच श्रेष्ठ दान’ या सामाजिक संदेशातून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज असणाऱ्या माता–भगिनी तसेच थॅलेसेमिया व कर्करोगासारख्या गंभीर आजारांशी लढणाऱ्या रुग्णांसाठी रक्ताची मोठी गरज असते. रक्ताची निर्मिती कारखान्यात होत नसल्याने निरोगी रक्तदात्यांचे रक्तदान महत्त्वाचे ठरते. त्यामुळे धार्मिक उपासनेसोबत राबविण्यात आलेल्या या जीवनदायी उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

दरम्यान, माळेगाव येथील महादेव मंदिरात गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सोमवारी सांगता झाली. सांगता सोहळ्यानिमित्त ह.भ.प. पांडुरंग महाराज झुबड यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनाला भाविकांची मोठी उपस्थिती होती. नामस्मरण, भक्ती, सदाचार आणि सामाजिक एकोप्याचा संदेश त्यांनी कीर्तनातून दिला.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्रावण सोमवारचे दर्शन, रक्तदान शिबिर, हरिनाम सप्ताहाची सांगता आणि छोटी यात्रा यामुळे महादेव मंदिर परिसरात दिवसभर उत्साहाचे व भक्तिमय वातावरण होते.

# वृद्धेश्वराच्या दर्शनासाठी तीन लाख भाविकांची मांदियाळी

## तिसऱ्या श्रावणी सोमवारी कावडीच्या गंगाजलाने जलाभिषेक | आ. अक्षय कर्डिले व युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कृष्णा राजळे यांच्या हस्ते महापूजा

**• पाथर्डी | वीरभूमी–**

**नाथ संप्रदायाचे उगमस्थान म्हणून देशभरात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथे तिसऱ्या श्रावणी सोमवारी राज्याच्या विविध भागांतून आलेल्या सुमारे तीन लाख भाविकांनी स्वयंभू वृद्धेश्वर शिवपिंडीचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. 'वृद्धेश्वराच्या आशीर्वादाने भरपूर पाऊस पडू दे, पाणीटंचाई दूर होऊ दे, राज्यावरील सर्व अरिष्टे दूर होऊन देशाची चौफेर प्रगती होऊ दे,' अशी प्रार्थना करत आमदार अक्षय कर्डिले व भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कृष्णा राजळे पाटील यांनी वृद्धेश्वराची महापूजा केली.**



आमदार अक्षय कर्डिले व भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस कृष्णा राजळे पाटील यांच्या हस्ते मुख्य महापूजा झाली. भूषण देवा, आप्पा देवा यांच्यासह ब्रह्मवृंदांनी महापूजेचे पौरोहित्य केले. यावेळी भाजपचे युवा नेते कुशल भापसे, सोमनाथ अकोलकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व भाविक उपस्थित होते.

नाथ संप्रदायाच्या परंपरेत श्रीक्षेत्र वृद्धेश्वराला विशेष महत्त्व आहे. येथील स्वयंभू शिवपिंडीचे दर्शन घेतल्यास बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. भगवान आदिनाथ अर्थात वृद्धेश्वरांनी गोरक्षनाथांना येथे कलियुगाच्या अंतापर्यंत वास्तव्य करण्याचा आशीर्वाद दिला आणि नाथ संप्रदायाची पताका विश्वकल्याणासाठी सर्वत्र फडकत राहील, अशी मान्यता धर्मग्रंथांत असल्याचे साधक सांगतात. परिसरातील साधुसंत, ऋषी-मुनी व उच्च कोटीच्या साधकांनी तपश्चर्या केलेल्या गुंफांमुळे वृद्धेश्वराची भूमी आध्यात्मिक ऊर्जेने भारलेली असल्याची भाविकांची भावना आहे.

आगामी काळाचा विचार करता वृद्धेश्वर, मढी व मायंबा या तीनही तीर्थक्षेत्रांचा एकत्रित विकास आराखडा राबविणे गरजेचे असल्याचे आमदार कर्डिले यांनी सांगितले. मंदिर परिसराचे सुशोभीकरण, पार्किंग व्यवस्था, रस्त्यांचे रुंदीकरण आदी कामांसाठी सुमारे दोन कोटी रुपयांचा प्रस्तावित विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. तीर्थक्षेत्र विकास योजनेत 'ब' वर्ग देवस्थान समितीचा समावेश करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

यात्रेनिमित्त पंचक्रोशीतील विविध गावांतून सुमारे दीड हजार कावडी पैठणहून गंगाजल घेऊन पहाटेपर्यंत वृद्धेश्वर येथे दाखल झाल्या. महापूजेनंतर कावडीतील पवित्र गंगाजलाने स्वयंभू शिवपिंडीवर जलाभिषेक करण्यात आला.

देवस्थान समितीचे अध्यक्ष गणेश पालवे, सर्व विश्वस्त, मानकरी पुजारी नितीन जाधव व शेखर जाधव आणि शिवभक्त मुरलीधर पालवे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. व्यवस्थापक शिवाजी पालवे, कानिफनाथ पाठक, ज्ञानेश्वर पाठक, सोन्या बापू पालवे यांच्यासह देवस्थान समितीचे कर्मचारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहन खंडागळे, पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस कर्मचारी नागेश वाघ तसेच पाथर्डी पोलीस दल व गृह रक्षक दलाने यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### यंदा वाहतूक कोंडीतून भाविकांना मिळाला दिलासा

■ यात्रेनिमित्त भाविक व विविध मंडळांच्या वतीने दिवसभर प्रसाद व पाण्याचे वाटप करण्यात आले. मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. गेल्या अनेक वर्षांपासून असलेला पार्किंगचा प्रश्न पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या सहकार्याने मार्गी लागल्याने यंदा वाहतूक कोंडी झाली नाही.

# पोपटराव पवार यांना ब्रह्माकुमारी भगिनींकडून रक्षासूत्र

## हिवरे बाजार येथे सदिच्छा भेट | ब्रह्माकुमारी साधना दीदींच्या हस्ते औक्षण

**• पारनेर | वीरभूमी–**

रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या वतीने आदर्श गाव हिवरे बाजार येथे ज्येष्ठ समाजसेवक व पद्मश्री पुरस्कारप्राप्त पोपटराव पवार यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. यावेळी पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी यांच्या हस्ते पोपटराव पवार यांना पवित्र रक्षासूत्र बांधून औक्षण करण्यात आले.



रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून समाजात प्रेम, बंधुभाव, विश्वास, सद्भावना आणि परस्पर सहकार्याची भावना वृद्धिंगत करणारा पवित्र सण आहे. याच सामाजिक व आध्यात्मिक भावनेतून ब्रह्माकुमारी भगिनींनी हिवरे बाजार येथे पवार यांची भेट घेऊन त्यांच्या समाजसेवेच्या कार्याचा गौरव केला. त्यांना रक्षासूत्र बांधून निरोगी आयुष्य व समाजहिताच्या कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजारच्या विकासासाठी केलेले कार्य देशभरात आदर्श मानले जाते. जलसंधारण, ग्रामविकास, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती आणि सामाजिक एकोपा या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे हिवरे बाजारने देशाच्या विकासाच्या नकाशावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अनेक गावांनी ग्रामविकासाची दिशा स्वीकारली आहे.

रक्षाबंधनानिमित्त आयोजित या उपक्रमातून आध्यात्मिकता व समाजसेवेचा सुंदर संगम घडून आला. समाजात सकारात्मक विचार, नैतिक मूल्ये, शांतता आणि बंधुभाव वाढविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी, सुपा सेंटरच्या प्रतिमा माताजी, देवराम ढोले, दिलीप थोरे, राम भाई तसेच स्नेहालय संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# भूमिपुत्र उपजिल्हाधिकारी जितेंद्र इंगळे यांचा गौरव

## आ. विक्रमसिंह पाचपुते यांच्या हस्ते खांडगावातील ५१ कर्तबगारांचाही सत्कार

**• श्रीगोंदा | वीरभूमी–**

ग्रामीण आणि दुर्गम भागातून पुढे येत प्रशासकीय सेवेत उपजिल्हाधिकारीपदापर्यंत मजल मारणारे खांडगावचे सुपुत्र तथा पनवेलचे तहसीलदार जितेंद्र इंगळे यांचा उपजिल्हाधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल खांडगावातील तरुण व ग्रामस्थांच्या वतीने रविवा दि.३१ रोजी भव्य नागरी सन्मान करण्यात आला. आ. विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या हस्ते इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी डॉ. सुप्रिया इंगळे, आकाश टकले, सुनील टकले आणि संजय टकले यांच्यासह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खांडगावातील ५१ कर्तबगार तरुणांचा गौरव करण्यात आला. डॉ. सुप्रिया इंगळे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनासाठी भारतीय पेटंट मिळवल्याबद्दल, आकाश टकले यांची एमपीएससीच्या माध्यमातून राज्य उत्पादन शुल्क विभागात पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल, तर सुनील टकले व संजय टकले यांची पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील गुणवंत तरुणांनी जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर मिळवलेले यश निश्चितच अभिमानास्पद आहे. त्यांच्या यशातून गावातील विद्यार्थी व तरुणांनी प्रेरणा घ्यावी. शिक्षण, रोजगार आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू, असा विश्वास आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी व्यक्त केला.

खांडगावच्या मातीत जन्मलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव व्हावा आणि त्यांच्या यशाची प्रेरणा पुढील पिढीला मिळावी, या भावनेतून तरुणांनी एकत्र येत प्रथमच असा नागरी सन्मान सोहळा आयोजित केला. अधिकारीपदावर पोहोचल्यानंतरही आपल्या मातृभूमीशी नाळ कायम जोडून ठेवणाऱ्या जितेंद्र इंगळे यांच्या कार्याचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे मार्गदर्शक व ज्येष्ठ आदर्श शिक्षक पोपट गोसावी गुरुजी होते. यावेळी ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस, बाळासाहेब महाडिक, काकासाहेब ढवळे, लक्ष्मण महाराज टकले, आनंदराव भगत, संतोष भगत, सचिन ढवळे, शंकर टकले, राम घोडके यांच्यासह शेकडो ग्रामस्थ, तरुण-तरुणी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेश इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन अशोक टकले यांनी केले, तर आभार सूर्यभान टकले यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी संजय शिंदे, दिलीप शिंदे, संदीप शिंदे, युवराज ढवळे यांच्यासह अनेक तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

# विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक

## विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीतील सुरक्षितता, स्थलांतर व प्रथमोपचाराचे प्रशिक्षण

**• अहिल्यानगर | वीरभूमी–**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर येथे समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने बी.एस्सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन आपत्ती प्रात्यक्षिक सराव (Fire Disaster Mock Drill) घेण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थिती व आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा उपक्रमाचा उद्देश होता.

या प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना आगीसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्पर, प्रभावी व सुरक्षितपणे प्रतिसाद देण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर अलार्म देणे, संबंधित अधिकाऱ्यांना माहिती देणे, रुग्ण व नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर करणे, घाबरून न जाता परिस्थिती हाताळणे आणि बाधितांना तातडीने प्रथमोपचार देणे याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले.

आपत्तीच्या काळात रुग्णांची सुरक्षितता, तातडीचे उपचार, सुरक्षित स्थलांतर आणि आपत्कालीन पथकांशी समन्वय साधण्यात परिचारिकांची भूमिका महत्त्वाची असते. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले.

मॉक ड्रिलमध्ये बाधित व्यक्तींना रुग्णवाहिकेतून सुरक्षितपणे रुग्णालयात हलविणे आणि तेथे आवश्यक आपत्कालीन उपचार उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेचाही समावेश होता. आपत्कालीन प्रतिसादापासून सुरक्षित स्थलांतर, रुग्णवाहिका वाहतूक आणि वैद्यकीय उपचारांपर्यंतच्या विविध टप्प्यांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यामुळे वेळेवर उपचार आणि विविध विभागांमधील समन्वयाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत संघभावना, प्रभावी संवाद, नेतृत्वगुण व तत्पर निर्णयक्षमता यांचे प्रदर्शन केले. तसेच आरोग्यसेवा, सुरक्षा व सहाय्यक पथकांमधील समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले. सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष कृती यांच्यातील दुवा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. अभिजित दिवटे, संचालक (वैद्यकीय) यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. सतीश मोरे, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल; डॉ. मयुरी वाळुंज, कॅज्युअल्टी ऑफिसर (अपघात व आपत्कालीन विभाग अधिकारी) आणि श्री. आंबोरे, सुरक्षा अधिकारी यांचे सहकार्य लाभले.



हा कार्यक्रम प्रा. डॉ. प्रतिभा चांदेकर, प्राचार्य आणि प्रा. डॉ. योगिता औताडे, उपप्राचार्य तथा विभागप्रमुख, समुदाय आरोग्य परिचर्या विभाग यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. सर्व विभागप्रमुख, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे विद्यार्थ्यांनी उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.